*मुद्रा यशोगाथा*

*नाव :- श्रीमती ज्योती प्रकाश घुगे, नाशिक*

*व्यवसाय :- चहाचा स्टॉल*

**लाभार्थ्याचा माहिती :- श्रीमती ज्योती प्रकाश घुगे , नाशिक शहरातील महात्मा गांधी मार्ग, येथे राहणारी सर्वसामान्य गृहिणी. कुटुंबात 3 पौढ व 2 शाळेत जाणारी चिमुरडी मुले. उत्पनाच्या मर्यादित साधनामुळे घराची परिस्थिती कायम ओढाताणीची . त्यातच ज्योतीला मुद्रा बँक योजनेची माहिती मिळाली. तिने जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र च्या नाशिक शहर शाखेत मुद्रा योजनेंतर्गत शिशुगटात चहा स्टॉल चालू करण्यासाठी रु. 40,000 कर्जासाठी अर्ज केला. आज सदर चहा स्टॉलच्या सहाय्याने ती रु. 9000/- महिना कमावते. त्यातून तिचा घरखर्च व मुलानाचे शिक्षणाचा खर्च भागतो तसेच कर्जाच्या हप्त्यांची रक्कम देऊन तिची बचत देखील होते. हे केवळ मुद्रा बँक योजनेमुळे शक्य झाल्याचे ज्योती आवर्जून सांगते .**

---------